दैनिक

MAHILA SANVAD

# महिला संवाद

आवृत्ती : पुणे PRGI Reg. No. - MHMAR/25/A1224 इतर आवृत्ती : मुंबई - जालना- छत्रपती संभाजीनगर - सोलापूर - सातारा

संपादक : ज्योती मधुकर आडेकर | कार्यकारी संपादक : विद्या जाधव | उप संपादक : सौ. सुनंदा राजु निक्रड

PUNE : Volume No. 1, Issue No. 271, Marathi Daily Thursday, Date - 30 April 2026 Price 2 Rupees, Pages - 4

पुणे अवृत्ती | वर्ष १ ले | अंक २७१ वा | मराठी दैनिक | गुरूवार दि. ३० एप्रिल २०२६ | किंमत २ रुपये | पाने ४

**महिला प्रतिनिधी पाहिजेत**

जालना आणि पुणे येथून प्रकाशित होणारे महिला संवाद या मराठी वृत्तपत्रासाठी जिल्हा, तालुका आणि सर्कलसाठी महिला प्रतिनिधी पाहिजेत.

सामाजिक, शैक्षणिक, धामिर्क, राजकीय आणि भौगोलिक माहिती असणाऱ्यांनी खालील पत्तयावर संपर्क साधावा.

महिला संवाद

कार्यालय
दैनिक महिला संवाद,
गांधी चमन, सावित्रीबाई फुले चौक, जालना. 9168567111

# केबल गळ्यात अडकून महिलेचा मृत्यू

**मुंबई । प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील निगडी प्राधिकरण परिसरात लोंबकळणाऱ्या केबलमुळे घडलेल्या दुर्दैवी अपघातात एका महिलेचा मृत्यू झाल्याने शहरात संताप व्यक्त होत आहे. संपदा पटवर्धन (वय ५०) असे मृत महिलेचे नाव असून, प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे हा बळी गेल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, संपदा पटवर्धन या घरातील काही साहित्य आणण्यासाठी बाहेर गेल्या होत्या. परतत असताना सेक्टर २६ मधील प्रबोधन सोसायटी ते ज्ञानप्रबोधिनी मार्गावर लोंबकळणारी केबल त्यांच्या गळ्याला अडकली. त्यामुळे त्यांचे दुचाकीवरील नियंत्रण सुटून त्या जोरात खाली पडल्या. आवाज ऐकून परिसरातील काही मुलांनी तत्काळ धाव घेत त्यांना निगडीतील खासगी रुग्णालयात दाखल केले.

शनिवारी सकाळी घडलेल्या या घटनेत डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने त्या दोन दिवस कोमात होत्या. मात्र उपचारादरम्यान मंगळवारी, २८ एप्रिल रोजी सकाळी त्यांचे निधन झाले. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

दरम्यान, वीस दिवसांपूर्वीच संपदा पटवर्धन यांच्या वडिलांचे निधन झाले होते. त्या दुःखातून कुटुंब सावरत असतानाच पुन्हा एक मोठा आघात बसला आहे. त्यांच्या पश्चात पती, मुलगा स्वानंद (वय २९), मुलगी क्षिप्रा (वय २२) आणि आई असा परिवार आहे.

संपदा पटवर्धन या सामाजिक कार्यात सक्रिय होत्या. निगडीतील स्वातंत्र्यवीर सावरकर मंडळाच्या महिला विभागाच्या त्या कोषाध्यक्ष होत्या. तसेच सूत्रसंचालनाची आवड, मंगळागौरीच्या खेळांचा ग्रुप आणि उत्साही स्वभावामुळे त्यांचा मोठा जनसंपर्क होता. त्यांच्या निधनामुळे मैत्रिणी व ओळखीतील व्यक्तींमध्ये शोक व्यक्त केला जात आहे.

या घटनेनंतर शहरातील अनधिकृत केबल आणि इंटरनेट वायरींच्या जाळ्याबाबत गंभीर प्रश्न उपस्थित



झाले आहेत. निगडी-प्राधिकरण, काळेवाडी, पिंपळे गुरव, भोसरी, पिंपरी, मोशी, चिंचवड आदी भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर अशा धोकादायक केबल्स लोंबकळत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. संबंधित कंपन्यांवर नियंत्रण ठेवण्यात महापालिकेचे अपयश असल्याचा आरोपही केला जात आहे.

या संदर्भात आमदार अमित गोरखे यांनीही संताप व्यक्त करत प्रशासनाच्या भोंगळ कारभारावर टीका केली आहे. अनधिकृत केबल्समुळे नागरिकांचे जीव धोक्यात आले असून, जबाबदारांवर कठोर कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली आहे. तसेच, संपदा पटवर्धन यांच्या मैत्रीण वनिता मोहिते यांनीही तीव्र भावना व्यक्त करत शहरातील रस्त्यांची दुरवस्था आणि लोंबकळणाऱ्या केबल्समुळे नागरिकांना सतत धोका निर्माण होत असल्याचे सांगितले. या घटनेमुळे पटवर्धन कुटुंब उद्ध्वस्त झाले असून, दोन मुलांचे आईचे छत्र हरपल्याची वेदना त्यांनी व्यक्त केली. या दुर्दैवी घटनेनंतर पिंपरी-चिंचवड शहरातील प्रशासनाने तातडीने अशा धोकादायक केबल्सवर कारवाई करून नागरिकांच्या सुरक्षेसाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

**पाहिजेत**

महाराष्ट्रातील निर्भिड आणि निष्पक्ष दैनिक महिला संवाद या वृत्तपत्रासाठी पुणे जिल्ह्यातील सर्व तालुक्यात प्रतिनिधी पाहिजेत इच्छुकांनी खालील प्रत्यावर अथवा क्रमांकावर संपर्क साधावा.

अनंत पार्क काळेवाडी रोड राहटणी धनगर बाबा मंदिरा जवळ पुणे शहर पुणे-४३१००३

संपर्क - 9168567111

वरील क्रमांकावर बायोडाटा पाठवावा

## थोडक्यात...

### राज्य वर्धापन दिनाच्या मुख्य शासकीय समारंभाची रंगीत तालीम

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या ६७ व्या वर्धापन दिनानिमित्त दादर येथील छत्रपती शिवाजी महाराज मैदानावर शुक्रवार, १ मे २०२६ रोजी मुख्य शासकीय समारंभ आयोजित करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाची रंगीत तालीम याच मैदानावर घेण्यात आली. यावेळी ध्वजवंदन राजशिष्टाचार विभागाचे उपसचिव चंद्रकांत मोरे यांनी केले. राष्ट्रीय गीत, राष्ट्रगीत आणि राज्यगीताने ध्वजाला सलामी देण्यात आली. शासनाच्या सामान्य प्रशासन विभाग (राजशिष्टाचार) यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. याप्रसंगी गृह विभागाचे अपर पोलीस महासंचालक (प्रशासन) मधुकर पांडे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

या कार्यक्रमात २६ जानेवारी २०२६ रोजी झालेल्या प्रजासत्ताक दिन समारोहात उत्कृष्ट संचलन केलेल्या पथकांना अपर पोलीस महासंचालक मधुकर पांडे यांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली. यामध्ये सशस्त्र दल, नि:शस्त्र दल आणि शालेय पथकास पारितोषिक देण्यात आले. सशस्त्र दलांमध्ये प्रथम पारितोषिक राज्य राखीव पोलीस पथक, द्वितीय पारितोषिक बृहन्मुंबई पोलीस सशस्त्र पुरुष पथक आणि तृतीय पारितोषिक संयुक्तपणे बृहन्मुंबई दंगल नियंत्रण पथक, गोंदिया व गडचिरोली जिल्ह्याचे सी ६० पथक यांनी पटकाविला. नि:शस्त्र दलांमध्ये प्रथम पुरस्कार मुंबई अग्निशमन दल, द्वितीय पुरस्कार सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा, तृतीय क्रमांक राज्य उत्पादन शुल्क यांनी पटकाविला.

या संचलनामध्ये शालेय पथके सहभागी झाली होती. शालेय पथकांमध्ये प्रथम पुरस्कार रोड सेफ्टी पेट्रोल मुलींच्या रुस्तमजी इंटरनॅशनल स्कूल, दहिसर यांच्या पथकास, द्वितीय पुरस्कार रोड सेफ्टी पेट्रोल मुलांच्या डॉ. न्टोनियो डा सिल्वा हायस्कूल, दादर यांच्या पथकास आणि तृतीय पुरस्कार रोड सेफ्टी पेट्रोल मुले सेंट पॉल हायस्कूल, दादर यांच्या पथकाने पटकाविला. याशिवाय केंद्र शासनाच्या गृह मंत्रालयाच्या वतीने शासकीय शाळांमधील आठवी आणि नववीच्या विद्यार्थ्यांना सशस्त्र पोलीस दलाच्या आधुनिकीकरण अंतर्गत स्टुडंट पोलीस कॅडेट प्रोग्राम राबविण्यात येत आहे. यामध्ये शासकीय व बृहन्मुंबई महापालिकेच्या २४४ शाळांमध्ये हा कार्यक्रम प्रभावीपणे राबविला जात आहे.२०२५ - २६ या शैक्षणिक वर्षामध्ये पोलीस कॅडेट प्रोग्रॅम अंतर्गत उल्लेखनीय कामगिरी केलेल्या शाळांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. यामध्ये प्रथम पुरस्कार मराठी मुंबई पब्लिक स्कूल, विलेपार्ले (पश्चिम), द्वितीय पुरस्कार एस.एस.एस मल्टीपर्पज टेक्निकल हायस्कूल मुंबई आणि तृतीय पुरस्कार अंजुमन आय इस्लाम बद्रुद्दिन तैयबजी हायस्कूल मुंबई यांनी पटकाविला. यानंतर राज्य राखीव पोलीस दल, बृहन्मुंबई सशस्त्र पोलीस दल, बृहन्मुंबई दंगल नियंत्रण पथक, बृहन्मुंबई सशस्त्र महिला पोलीस दल, निशाण टोळी (महाराष्ट्र पोलीस ध्वज, बृहन्मुंबई पोलीस ध्वज, राज्य राखीव पोलीस बल ध्वज, महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय ध्वज, बृहन्मुंबई अग्निशमन दल ध्वज, गृहरक्षक दल ध्वज), मुंबई लोहमार्ग पोलीस दल, मुंबईत पुरुष पोलीस दल, बृहन्मुंबई वाहतूक पोलीस दल, गृहरक्षक दल महिला पथक, मुंबई अग्निशमन दल,मुंबई महापालिका सुरक्षा रक्षक दल, सुरक्षा सुरक्षा मंडळ दल मुंबई आणि ठाणे जिल्हा, यांनी मानवंदना दिली.

## चौकीदार भरती जाहिरात दुरुस्त करण्याचे आदिवासी विकास मंत्री अशोक वुईके यांचे निर्देश

**मुंबई । प्रतिनिधी**

आदिवासी विकास विभागाच्या नाशिक येथील आयुक्तालयाने २७ एप्रिल २०२६ रोजी प्रसिद्ध केलेल्या चौकीदार पदांच्या जाहिरातीत अनुसूचित जमाती (एसटी) संवर्गासाठी एकही पद राखीव नसल्याचे समोर आल्यानंतर आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वुईके यांनी तातडीने हस्तक्षेप करत संबंधित अधिकाऱ्यांना जाहिरात दुरुस्तीचे निर्देश दिले.

मंत्री डॉ. अशोक वुईके यांनी विभागाचे सचिव व आयुक्त यांच्यासोबत व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे बैठक घेतली. या बैठकीत २० नोव्हेंबर २०२५ च्या शासन निर्णयातील तरतुदींचा सखोल अभ्यास करून जाहिरात दुरुस्त करण्याचे आणि तत्काळ सुधारित जाहिरात प्रसिद्ध करण्याचे आदेश देण्यात आले. मंत्री डॉ. अशोक वुईके म्हणाले, चौकीदार पदांच्या भरतीसाठी शुद्धीपत्रक काढण्यात येणार असून, अनुसूचित जमाती उमेदवारांवर होणारा अन्याय दूर केला जाणार आहे. तसेच, अट्रॉसिटी कायद्यांतर्गत पीडितांच्या वारसदारांना शासकीय सेवेत संधी देण्यासाठी विशेष उपाययोजना करण्यात आली आहे. आदिवासी विकास विभागातील वर्ग-४ मधील १५१ पदे पुनरुज्जीवित करून एकदाच विशेष बाब म्हणून या पदांवर नियुक्त्या केल्या जाणार आहेत.

## देहूरोड गोळीबार प्रकरणात मोठी कारवाई; दोन संशयित पोलिसांच्या ताब्यात

**पुणे । प्रतिनिधी**

देहूरोड गोळीबार प्रकरणात मोठी अपडेट समोर आली असून या प्रकरणी देहूरोड पोलिसांनी दोन संशयितांना ताब्यात घेतलं आहे. काल (२९ एप्रिल) रात्रीच्या सुमारास देहूरोडमध्ये झालेल्या गोळीबारात रमेश रेड्डीची गोळ्या झाडून हत्या झाली होती. या प्रकरणात पोलिसांनी तपासाचे चक्र गतिमान करत दोन संशयित पोलिसांनी ताब्यात घेतले आहेत. यातील एक संशयित मावळ तालुक्यातील गहुंजे मधील साई नगरमधून ताब्यात घेण्यात आला आहे. तर दुसरा संशयित देहूरोड मधील थॉमस कॉलनी इथून पहाटेच्या दरम्यान पोलिसांनी ताब्यात घेतला आहे. सध्या पोलीस या प्रकरणाचा तपास करत असून यातील मारेकरी शोधून काढणं आता पोलिसांपुढचं आव्हान असणार आहे.




देहूरोडमध्ये गोळीबारची थरारक घटना घडली होती. यात भाजपचे सक्रिय कार्यकर्त्य असलेलं रमेश रेड्डी यांच्यावर अज्ञात हल्लेखोरांनी गोळीबार केला असून यात एकामागोमाग एक राऊंड फायर केले होते. यातील एक गोळी रमेश रेड्डी यांच्या मस्तकाला भेदून गेल्याने त्याना जखमी अवस्थेत देहूरोडच्या आधार हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल केलं असता, उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केलं. दरम्यान, या घटनेनं परिसरात मोठा तणाव निर्माण झाला होता, तर रमेश रेड्डीचे नातेवाईक मित्र परिवाराने हॉस्पिटलमध्ये आक्रोश करत जुना पुणे-मुंबई महामार्ग जाम करण्याचा प्रयत्न केला, पण देहूरोड पोलिसांच्या हस्तक्षेपनंतर रमेश रेड्डीचा मृतदेह पिंपरी चिंचवडच्या यशवंतराव चव्हाण रुग्णालयात हलविण्यात आला. तर रमेश रेड्डीवर हल्ला झाल्याचं कारण पोलीस तपासात समोर येईल तर या गोळीबाराच्या घटनेमुळे देहूरोड बाजारातील दुकाने व्यापारी वर्गाने त्वरित बंद केली होती.

या घटनेनंतर परिसरात पोलीस बंदोबस्त वाढवण्यात आला आहे. अशातच आता पोलिसांनी तपासाची चक्र गतिमान करत दोन संशयितांना अटक केली आहे.

## नववधूसह तिघांचा जागीच मृत्यू

**जळगाव । प्रतिनिधी**

जळगाव जिल्ह्याच्या धरणगावमध्ये एक अतिशय हृदयद्रावक अपघाताची घटना घडली आहे. यात नवरीला परत घेऊन जाणाऱ्या वाहनाचा भीषण अपघात झाला आहे. धरणगाव तालुक्यातील वराड सिम येथे हा अपघात झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, क्रुझर वाहनाचे पुढील चाक निखळल्यामुळे वाहन ट्रकला धडकले आहे. हि धडक इतकी भीषण होती कि यात वाहन पलटी झाले आहे. या दुर्दैवी अपघातात तीन जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. तर अन्य सहा जण गंभीर जखमी झाले आहे. मिळलेल्या माहितीनुसार, या दुर्दैवी अपघाताच्या घटनेत नववधूसह तीन जण जागीच ठार झाले आहे. तर यात एका लहान बालकाची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती आहे. सध्या जखमींवर जळगावच्या जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहे. गुजरात व्यापी येथून अकोला येथे जात असताना वाहनाचा हा अपघात



झाला आहे. घटनेची माहिती मिळताच कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यानंतर जळगाव जिल्हा रुग्णालयात नातेवाईकांनी एकच आक्रोश केल्याचे दिसून आलं. या दुर्दैवी घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली असून काळानं अशी अचानक झडप घातल्याने सर्वत्र शोककळा पसरली आहे. पूजा रवी वाघळकर, असे मयत नववधूचे नाव आहे. तर दत्तू भागवत, जगदीश वाघळकर अशी इतर मयताची नावे आहेत.

अमरावतीतील धर्मांतर प्रकरण ताजे असतानाच बीडच्या माजलगावातील मुलीवर कॅफेमध्ये करण्यात आलेल्या अत्याचार प्रकरणाला देखील नवीन वळण मिळाले आहे. या प्रकरणाच्या तपासात धक्कादायक माहिती समोर आली असून आरोपीने पीडितेचे अश्लील व्हिडिओ बनवून पीडितेवर धर्मांतरासाठी देखील दबाव टाकला गेला. चौकशीत पोलिसांना संशयास्पद व्हॉट्सप चॅटिंग सापडली असून त्यावरून धर्मांतराच्या अँगलने तपास सुरू करण्यात आला आहे. तर याच चॅटिंगवरून मुलीला आरोपी हा धर्मांतरासाठी दबाव टाकत असल्याचा देखील संशय पोलिसांना आहे. त्यामुळे माजलगावातही आता 'अमरावती पॅटर्न'ची पुनरावृत्ती झाल्याची चर्चा जोर धरू लागली आहे.

सायबर पोलिसांनी जेव्हा आरोपीचा मोबाईल जप्त करून त्याची तपासणी केली, तेव्हा अनेक खळबळजनक गोष्टी उघड झाल्या. या आरोपीच्या जाळ्यात केवळ ही एकच मुलगी नाही, तर परिसरातील इतर ५ ते ६ मुली देखील अडकल्याचा दाट संशय व्यक्त केला जात आहे. हा एखाद्या मोठ्या रॅकेटचा भाग तर नाही ना? असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

## मुंबई उपनगर जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांचा राज्य स्तरावर गौरव

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यात २८ एप्रिल हा 'द्वितीय सेवा हक्क दिन' म्हणून उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने, मुंबई उपनगर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी श्री. सौरभ कटियार यांना त्यांच्या प्रशासकीय कार्याबद्दल विशेष पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. जिल्ह्यातील तिन्ही तहसीलदार कार्यालयांत अत्याधुनिक 'सेतू सुविधा केंद्रे' उभारून जनतेला तत्काळ व पारदर्शक सेवा देण्याच्या नाविन्यपूर्ण उपक्रमाची दखल राज्य शासनाने घेतली आहे.



राज्याचे मुख्य सचिव राजेश अगरवाल आणि राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त मनुकुमार श्रीवास्तव यांच्या हस्ते हा गौरव सोहळा संपन्न झाला.

अत्याधुनिक सोयींनी युक्त 'सेतू'चा यशस्वी प्रयोग जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी पुढाकार घेऊन मुंबई उपनगरातील अंधेरी, बोरिवली आणि कुर्ला या तिन्ही तहसीलदार कार्यालयांचा चेहरामोहरा बदलला आहे. येथे उभारण्यात आलेली 'सेतू सुविधा केंद्रे' केवळ प्रशस्तच नाहीत, तर ती अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सज्ज आहेत. सामान्य नागरिकांना त्यांचे जातीचे दाखले, उत्पन्न प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र यांसारख्या सेवा मिळवताना कोणताही त्रास होऊ नये, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.


प्रशासनात सुलभता आणि गती आणण्यासाठी कटियार यांनी राबवलेल्या या मॉडेलचे कौतुक राज्यभर होत आहे. सेतू केंद्रांत येणाऱ्या नागरिकांसाठी उत्तम बैठक व्यवस्था, टोकन यंत्रणा आणि जलद कार्यपद्धती , whatsapp chatbot Am{U whatsapp वरती दाखले वितरण, यामुळे शासकीय कामांतील विलंब कमी झाला आहे. यामुळे वेळेत दाखले वितरण प्रमाण ५९% वरून ९९% पर्यत सुधारणा झाली आहे.

# कुख्यात राणा कांबळेची भररस्त्यात हत्या

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यात पुन्हा एकदा गुन्हेगारीने डोकं वर काढल्याचं धक्कादायक चित्र समोर आलं आहे. शहरातील गंगानगर परिसरात एका तडीपार गुंडाची अत्यंत निर्घृण पद्धतीने हत्या करण्यात आली आहे. कुख्यात गुंड राणा कांबळे याच्यावर कोयत्याने सपासप वार करत त्याचा खून करण्यात आला. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे. राणा कांबळे हा गेल्या काही महिन्यांपासून तडीपार होता. मात्र, तडीपार असतानाही तो गंगानगर परिसरात मुक्तपणे वावरत असल्याची बाब समोर आली आहे. यामुळे पोलिसांच्या कारभारावरही प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहेत.

राणा कांबळे याच्याविरोधात चोरी, मारामारीसह अनेक गंभीर गुन्हे दाखल होते. दरम्यान, वर्चस्वाच्या वादातून ही हत्या झाल्याची प्राथमिक माहिती पोलिस तपासातून समोर येत आहे. ओम मोरे आणि त्याच्या साथीदारांनी हा खून केल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. घटनेनंतर पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला आहे. काही संशयितांना ताब्यात घेण्यात आल्याची माहिती मिळत आहे. या घटनेमुळे पुण्यातील कायदा आणि सुव्यवस्थेवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झालं आहे. तडीपार गुंड शहरात मुक्तपणे कसे वावरत होते, हा मोठा प्रश्न आता उपस्थित होत आहे



मिळालेल्या माहितीनुसार, पुण्यात कुख्यात तडीपार गुंडाचा कोयत्याने वार करत खून करण्यात आला. गंगानगर परिसरात तडीपार गुंडाचा कोयत्याने हल्ला करत खून केला. राणा कांबळे या कुख्यात गुंडाचा खून झाला. राणा कांबळे गेल्या अनेक महिन्यापासून तडीपार होता असं असताना सुद्धा पुण्यातील गंगा नगर परिसरात राणाची दहशत होती. कांबळे याच्याविरुद्धच्या गुन्ह्यासह चोरी आणि मारामारीची गुन्हे आहेत. वर्चस्व वादातून ओम मोरे आणि त्याच्या साथीदारांनी राणा कांबळेला कोयत्याने सपासप वार करत हत्या केली.

पुण्यातील गंगानगरमध्ये ओम मोरे आणि राणा कांबळे याच्यात वाद झाला होता. या वादानंतर ओम मोरे आणि त्याच्या साथीदाराने राणा कांबळेला रस्त्यात गाठलं. ओम मोरे आणि त्याच्या साथादाराजवळ कोयते होते. त्यांच्यात सुरुवातीला बाचाबाची झाली. त्यानंतर ओम मोरे आणि त्याच्या साथीदाराने राणा कांबळेवर हल्ला केला. तिघांनी केलेल्या राणावर कोयत्याने वार केले. या हल्ल्यात राणा रस्त्यावरच कोसळला. तिघांच्या जीवघेणा हल्ल्यात त्याचा मृत्यू झाला. त्याच्यावरील हल्ल्याचा सीसीटीव्ही पोलिसांच्या हाती लागला.

## संपादकीय...

### शिक्षणाचं बाजारीकरण थांबायलाच हवं..

शिक्षण हे माणसाच्या आयुष्याला दिशा देणारं सर्वात मोठं साधन आहे. पण आज हाच शिक्षणाचा पवित्र क्षेत्र 'बाजार' बनताना दिसतो आहे. ज्ञान विकलं जातंय, आणि स्वप्नांना किंमत लावली जातेय. त्यामुळे शिक्षणाचं बाजारीकरण थांबला पाहिजे ही केवळ मागणी नाही, तर ती समाजाची अत्यंत गरजेची हाक आहे....

आज शिक्षणसंस्था या सेवा देणाऱ्या केंद्रांपेक्षा नफा कमावणाऱ्या उद्योगांसारख्या वागत आहेत. वाढत्या फी, डोनेशन, कोचिंग क्लासेसचा वाढता प्रभाव-या सगळ्यामुळे शिक्षण सर्वांसाठी समान राहिलेलं नाही. गरीब आणि मध्यमवर्गीय कुटुंबांना आपल्या मुलांचं शिक्षण पूर्ण करणंही कठीण होत चाललं आहे....

या बाजारीकरणामुळे शिक्षणाचा मूळ हेतू हरवत चालला आहे....

विद्यार्थ्यांच्या ज्ञानविकासाऐवजी फक्त गुण, रँक आणि करिअर यांवर भर दिला जातोय. नैतिकता, मूल्यं आणि समाजाभिमुखता यांसारख्या गोष्टी मागे पडत आहेत. शिक्षक-विद्यार्थी नातंही आता 'व्यवहार' बनत चाललं आहे, जिथे भावना आणि आपुलकी कमी होत चालली आहे...

ही परिस्थिती बदलणं अत्यंत गरजेचं आहे. शिक्षणाला पुन्हा 'हक्क' आणि 'सेवा' म्हणून बघायला हवं. सरकारी शाळा आणि महाविद्यालयांचा दर्जा उंचावणं, खाजगी संस्थांवर नियंत्रण ठेवणं, आणि शिक्षण सर्वांसाठी परवडणारं बनवणं-हे उपाय तातडीने राबवले गेले पाहिजेत... शिक्षण हे विक्रीसाठी नसतं, ते घडवण्यासाठी असतं. जर आपण आजही या बाजारीकरणाकडे दुर्लक्ष केलं, तर उद्या ज्ञान नाही, तर फक्त पैशांनी विकत घेतलेली पदवीच उरेल...

म्हणूनच-शिक्षणाचं बाजारीकरण थांबायलाच हवं

**दैनिक महिला संवाद वर्तमानपत्र**
**संपादक**
**ज्योती आडेकर**

# नागरिकांना अधिक सुलभ, जलद आणि पारदर्शक सेवा देण्यावर भर देण्याची गरज - मुख्य सचिव राजेश अग्रवाल

**मुंबई । प्रतिनिधी**

नागरिकांना अधिक सुलभ, जलद आणि पारदर्शक सेवा देण्यावर भर देण्याची गरज असल्याचे राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी सांगितले. द्वितीय सेवा हक्क दिनानिमित्त सह्याद्री अतिथिगृह येथे सामान्य प्रशासन विभाग आणि राज्यसेवा हक्क आयोग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी कार्यक्रमास राज्य सेवा हक्क आयोगाचे मुख्य आयुक्त मनु कुमार श्रीवास्तव, सामान्य प्रशासन विभागाचे प्रधान सचिव अतुल पाटणे, कोकण विभागाचे आयुक्त बलदेव सिंह, पुणे विभागाचे आयुक्त सुधाकर तेलंग, छत्रपती संभाजीनगर विभागाचे आयुक्त किरण जाधव तसेच नाशिक विभागाच्या आयुक्त चित्रा कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती.

मुख्य सचिव अग्रवाल म्हणाले, पासपोर्टसारख्या कार्यक्षम प्रणालींचा आदर्श घेत शासनाच्या विविध विभागांमध्ये डिजिटल समन्वय वाढविण्याचे काम सुरू आहे. निकाल जाहीर होताच संबंधित माहिती आपोआप विविध विभागांकडे पोहोचून अल्पावधीत अहवाल तयार होईल, अशी प्रणाली विकसित केली जात आहे.

जी२जी, जी२सी आणि जी२बी सेवा अधिक सुलभ करण्यावरही भर दिला असुन पारंपरिक एजंट प्रणालीत बदल करून डिजिटल आणि एआय आधारित यंत्रणेकडे वाटचाल करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. डिजी लॉकर आणि गोल्डन डाटा यांच्या माध्यमातून प्रत्येक नागरिकाचा प्रोफाइल तयार करून त्याला आवश्यक शासकीय योजना आणि सेवा आपोआप उपलब्ध करून देण्याची संकल्पना त्यांनी मांडली.

मुख्य सचिवांनी पुढे सांगितले की, भविष्यात नागरिकांना वेगवेगळे ॲप वापरण्याची गरज भासणार नाही. एआय आधारित एजंट्स नागरिकांच्या आवाजावरून त्यांच्या गरजा ओळखून आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून निकाल देणार आहेत. या दृष्टीने शासन विविध कंपन्यांसोबत काम करत असून, येत्या काही महिन्यांत ही प्रणाली टप्प्याटप्प्याने कार्यान्वित होण्याची अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

राज्य सेवा हक्क आयोगाचे मुख्य आयुक्त मनु कुमार श्रीवास्तव यांनी सेवा हक्क दिनानिमित्त बोलताना शासनातील नाविन्यपूर्ण उपक्रमांना प्रोत्साहन देणे आणि त्यांचे संस्थात्मक रूपांतर करण्यावर भर दिला. त्यांनी सांगितले की, विविध अधिकाऱ्यांनी राबवलेले उपक्रम केवळ व्यक्तिनिष्ठ न राहता संपूर्ण यंत्रणेचा भाग व्हावेत, यासाठी त्यांचे योग्य दस्तऐवजीकरण करणे आवश्यक आहे. त्यामुळे हे उपक्रम इतर जिल्ह्यांमध्येही प्रभावीपणे राबवता येतील.

यावेळी त्यांनी सांगितले की, एका जिल्ह्यात यशस्वी ठरलेले उपक्रम संपूर्ण राज्यासाठी उपयुक्त ठरू शकतात. यासाठी संबंधित विभागांच्या सहकार्याने या उपक्रमांची पुनरावृत्ती करण्याचे प्रयत्न सुरू करणे गरजेचे आहे. अधिकाऱ्यांनी आपल्या उपक्रमांचे सविस्तर अहवाल तयार करून आयोगाकडे किंवा संबंधित अधिकाऱ्यांकडे सादर करावेत, असेही आवाहन त्यांनी केले.

मुख्य आयुक्तांनी कार्यक्रमात सन्मानित करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. तसेच, या कार्यक्रमासाठी व्यस्त वेळापत्रकातून उपस्थित राहिल्याबद्दल राज्याचे मुख्य सचिव यांचे विशेष आभार मानले. आपल्या मनोगताचा शेवट करताना त्यांनी सर्व अधिकाऱ्यांनी उत्तम कामगिरी सातत्याने सुरू ठेवावी, असे आवाहन केले.



प्रथम क्रमांक छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याने पटकावला असून जिल्हाधिकारी दिलीप स्वामी (भा.प्र.से.) व निवासी उपजिल्हाधिकारी श्री. विनय गोडा यांच्या नेतृत्वाखाली सुमारे ९१.४१ टक्के सेवा निर्धारित कालावधीत देण्यात आल्या. द्वितीय क्रमांक हिंगोली जिल्ह्याला मिळाला असून जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या मार्गदर्शनाखाली ९०.६० टक्के सेवा वेळेत प्रदान करण्यात आल्या. तृतीय क्रमांक अहिल्यानगर जिल्ह्याने मिळवला असून जिल्हाधिकारी पंकज आशिया यांच्या नेतृत्वाखाली ९०.५० टक्के सेवा वेळेत देण्यात आल्या. बीड जिल्ह्याने जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या नेतृत्वाखाली ९०.१३ टक्के सेवा निर्धारित कालावधीत देत उल्लेखनीय कामगिरी केली. या सर्व जिल्ह्यांनी नाविन्यपूर्ण उपक्रम राबवत नागरिकांना अधिक सुलभ व जलद सेवा देण्यात मोलाचे योगदान दिले असून, त्यांच्या कार्याचा कार्यक्रमात विशेष गौरव करण्यात आला. राज्य उत्पादन शुल्क विभागाचे आयुक्त डॉ. राजेश भागवत देशमुख यांनी डिजिटल ई-लॉक व नवीन ऑनलाइन सेवा सुरू करून सेवा प्रक्रियेला गती दिली. भूमिअभिलेख विभागाचे आयुक्त डॉ. सुहास दिवसे व सहायक, योगेश नवल यांनी जीआयएस आधारित ई-मोजणी, एआय आधारित नकाशा प्रक्रिया यांसारख्या उपक्रमांद्वारे तांत्रिक सुधारणा केल्या. तसेच पुणे महानगरपालिकेचे आयुक्त श्री. नवल किशोर राम यांनी पीएमसी केअर प, व्हाट्सप चॅटबॉट व नागरिक सुविधा केंद्र यांसारखे उपक्रम प्रभावीपणे राबविले.

मुंबई उपनगर जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी अत्याधुनिक सुविधा केंद्र उभारले, तर ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे व सहकारी रणजित यादव यांनी उत्कृष्ट सेवा केंद्राची संकल्पना राबवली. बुलढाणा जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील व प्रविण देवरे यांनी डिजिटल प्रणाली विकसित केली. नंदुरबार जिल्हाधिकारी मिताली सेठी, यवतमाळ जिल्हाधिकारी विकास मीना, जालना जिल्हाधिकारी आरिमा मित्तल तसेच अकोला पोलीस अधीक्षक अर्चित चांदक यांनीही विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून सेवा वितरण अधिक सक्षम केले. या सर्व अधिकाऱ्यांच्या कार्याचे या कार्यक्रमात विशेष कौतुक करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रधान सचिव अतुल पाटणे यांनी केले, तर आभार प्रदर्शन आयुक्त किरण जाधव यांनी मांडले. समग्र संस्थेच्या वतीने करण्यात आलेले विविध नाविन्यपूर्ण उपक्रमाचे सादरीकरण यावेळेस करण्यात आले.

## राज्याचा स्वतंत्र बियाणे कायद्याचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे सादर करणार - कृषी मंत्री दत्तात्रय भरणे

**मुंबई । प्रतिनिधी**

शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे उपलब्ध व्हावेत, त्यांना कायदेशीर संरक्षण मिळावे तसेच बियाणे खराब निघाल्यास त्याची नुकसानभरपाई तत्काळ मिळावी, यासाठी राज्याचा सर्व शिफारशींसह स्वतंत्र बियाणे कायदा करण्याबाबत प्रस्ताव केंद्र शासनाकडे सादर करण्याचे निर्देश कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिले. महाराष्ट्र विधानमंडळाच्या २०२५ दुसऱ्या पावसाळी अधिवेशनात विधानसभेत देण्यात आलेले आश्वासन क्र. ६७६ नुसार बियाणे कायदा १९६६ मधील प्रस्तावित बदल व सुधारणा विधेयकासंदर्भात मंत्रालयात आयोजित बैठकीत कृषी मंत्री भरणे बोलत होते. यावेळी आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने कायद्यात सकारात्मक निर्णय घेण्याच्या सूचना केल्या. बैठकीस दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे राज्यमंत्री ड. आशिष जयस्वाल उपस्थित होते. तसेच आमदार सईताई डहाके, राजेश बकाने, हेमंत ओगले, रणधीर सावरकर, कृषी आयुक्त सुरज मांढरे आणि कृषी संचालक सुनिल बोरकर उपस्थित होते.

कृषी मंत्री भरणे म्हणाले, राज्यासाठी स्वतंत्र बियाणे कायदा करताना प्रस्तावामध्ये शेतकऱ्यांना नुकसानभरपाई तातडीने मिळावी यासाठी ठोस तरतुदी कराव्यात. दर्जेदार बियाण्यांची जबाबदारी संबंधित कंपन्यांवर निश्चित करणे, महाबीज कंपनीची कार्यक्षमता वाढविणे, तसेच नियमभंग करणाऱ्या कंपन्यांवर कठोर कारवाई करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. याशिवाय जिल्हास्तरावर बियाणे तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्याची तरतूद करावी. 'साथी' पोर्टलवर ट्रुथफुल बियाण्यांची नोंदणी प्रक्रिया सुरू करणे, तसेच विद्यापीठांमार्फत होणाऱ्या संशोधन प्रक्रियेबाबत कायद्यात स्पष्ट तरतुदी करण्याचाही प्रस्तावात समावेश करण्याचे निर्देश त्यांनी दिले.



नव्या कायद्यात बियाणे उत्पादक, प्रक्रिया केंद्र, वितरक, विक्रेते आणि रोपवाटिका यांची नोंदणी सक्तीची करण्याचा विचार आहे. शेतकऱ्यांना स्वतःचे बियाणे साठवणे, वापरणे, देवाणघेवाण करणे आणि (ब्रँडेड नाव न वापरता) विक्री करण्यास कायदेशीर संरक्षण देण्याची तरतूद करण्यात येणार आहे. रोपवाटिकांची नोंदणी अनिवार्य करून त्यांना रोपांच्या उगमाचा नोंदवही ठेवणे बंधनकारक केले जाईल. तसेच बियाण्यांच्या पिशवीवर क्यूआर कोड देणे आणि 'सेंट्रलाइज्ड सीड ट्रेसिबिलिटी पोर्टल'द्वारे बियाण्यांचा मागोवा घेणे अनिवार्य करणे, बियाण्यांमधील विषाणू, बॅक्टेरिया आणि बुरशी यांचे प्रमाण निश्चित करण्यासाठी 'सीड हेल्थ स्टँडर्ड्स' लागू करण्याची तरतूदही करण्यात येणार असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

दरम्यान, शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे पुरवठ्यासाठी शासनाने तांत्रिकदृष्ट्या सक्षम उपाययोजना केल्या असून 'साथी' पोर्टलवर सर्व उत्पादक संस्थांची नोंदणी १०० टक्के पूर्ण झाली आहे. खरीप २०२६ हंगामापासून सर्व प्रकारच्या बियाण्यांचे उत्पादन, वितरण आणि विक्री या पोर्टलमार्फत करण्याची व्यवस्था करण्यात येत आहे. यामुळे संपूर्ण पुरवठा साखळीचा मागोवा घेणे, प्रमाणीकरण करणे आणि उत्तरदायित्व निश्चित करणे अधिक सुलभ होणार आहे.

## महाराष्ट्रातील हस्तलिखित दस्तऐवजांच्या नोंदीतून सांस्कृतिक वारसा जगासमोर आणावा - सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार

**मुंबई । प्रतिनिधी**

हस्तलिखित दस्तऐवजांच्या स्वरूपात असलेला ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा जतन करण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाने डिजिटल नोंदणीचा उपक्रम सुरू केला आहे. या नोंदणीसाठी 'हर घर दस्तक' ही विशेष मोहीम हाती घेण्यात येत आहे. या मोहिमेच्या निमित्ताने महाराष्ट्राच्या हस्तलिखित दस्तऐवजांच्या ऑनलाईन नोंदीतून सांस्कृतिक वारसा जगासमोर आणावा, असे निर्देश सांस्कृतिक कार्यमंत्री ड. आशिष शेलार यांनी दिले. पु. ल. देशपांडे कला अकादमीच्या सभागृहात याबाबत आयोजित बैठकीत मंत्री ड. आशिष शेलार बोलत होते. बैठकीस सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव किरण कुलकर्णी, संचालक विभीषण चवरे, उपसचिव सामंत आदी उपस्थित होते. तर दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी यांनी बैठकीत सहभाग घेतला.



मंत्री ड. आशिष शेलार म्हणाले, केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, देशभरातील हस्तलिखित दस्तऐवजांचे जतन आणि डिजिटलायझेशन करणे हे या मोहिमेचे मुख्य उद्दिष्ट आहे. यासाठी 'ज्ञानभारती प विकसित करण्यात आले आहे. या पच्या माध्यमातून राज्यातील हस्तलिखित दस्तऐवज डिजिटल स्वरूपात जतन केले जाणार आहेत. यामुळे भारताचा प्राचीन आणि समृद्ध सांस्कृतिक वारसा जागतिक स्तरावर पोहोचण्यास मदत होणार आहे.

येत्या १ मे रोजी 'महाराष्ट्र दिना'चे औचित्य साधून, राज्यातील सर्व ग्रामसभेत हस्तलिखित नोंदणीचा विषय प्राधान्याने मांडण्याचे निर्देशही मंत्री ड आशिष शेलार यांनी देत गावपातळीवरील हस्तलिखित स्वरूपातील स्थानिक वारसा जतन करण्यासाठी हा उपक्रम अत्यंत महत्त्वाचा ठरणार असल्याचे सांगितले.

स्थानिक पातळीवर हस्तलिखित दस्तऐवज उपलब्ध असलेल्या विविध संस्था, ऐतिहासिक घराणी, नागरिक, संघटना आणि कुटुंबे यांची पुढील सात दिवसात जिल्हा व तालुकास्तरीय सविस्तर यादी तयार करावी. यादी तयार झाल्यानंतर संबंधितांशी संपर्क साधून त्यांच्याकडील दस्तऐवजांची माहिती घेत 'ज्ञानभारती' पवर त्यांची नोंदणी करावी. या नोंदणी प्रक्रियेत दस्तऐवजांची मूळ मालकी संबंधित संस्था, घराणी किंवा नागरिकांकडेच कायम राहील. केवळ दस्तऐवजांचे जतन करणे हाच या उपक्रमाचा मूळ हेतू आहे, असेही मंत्री ड. आशिष शेलार यांनी यावेळी स्पष्ट केले. महाराष्ट्राकडे हस्तलिखितांच्या स्वरूपात असलेला इतिहास हा अमूल्य आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून आपल्याकडील ऐतिहासिक दस्तऐवज जागतिक स्तरावर नेण्याची ही एक सुवर्णसंधी आहे. हा केंद्र शासनाचा महत्त्वाचा उपक्रम असून यामध्ये सर्वांनी आपले योगदान द्यावे, असे आवाहनही त्यांनी केले.

## कागदपत्रांचा पुरावा




आपण अनेकदा म्हणतो-देश पुढे चाललाय, व्यवस्था सुधारतेय, माणूस प्रगती करत आहे पण कधी कधी एखादी घटना अशी समोर येते, जी या सगळ्या दाव्यांना क्षणात खोटं ठरवते. ओडिशातील केओंझार जिल्हा मधील दियानाली गावात घडलेली जितू मुंडा यांची कहाणी ही केवळ एक बातमी नाही, तर ती आपल्या संवेदनाहीन व्यवस्थेचा आरसा आहे-जिथे कागद जिवंत माणसांपेक्षा मोठे ठरतात.

ओडिशातील त्या छोट्याशा गावात एक घटना घडली पण ती केवळ घटना नव्हती-ती एका भावाच्या हृदयातून फुटलेली वेदना होती...

जितू मुंडा नावाचा एक साधा, अशिक्षित आदिवासी माणूस ज्याचं आयुष्य कदाचित आधीच संघर्षांनी भरलेलं होतं त्याला स्वतःच्या बहिणीच्या मृत्यूचं दुःख पचवायचंही नीट वेळ मिळाला नाही. ....

बहिण गेली घरातली सावली गेली आणि उरली ती फक्त आठवण आणि तिच्या नावावरचे काही पैसे.

ते पैसे काढण्यासाठी जितू वारंवार बँकेत गेला पण प्रत्येक वेळी त्याला फक्त एकच उत्तर मिळालं-कागद आणा पुरावा आणामी

ज्याने आयुष्यभर कागदांपेक्षा माणसांवर विश्वास ठेवला त्याच्याकडून कागद मागितले गेले...

आणि मग एक दिवस त्या भावाने ठरवलं-पुरावा देतो तो आपल्या बहिणीच्या कबरीकडे गेला जिथे आठवणी झोपल्या होत्या जिथे त्याने शेवटचा निरोप दिला होता

त्या मातीतून त्याने स्वतः च्या बहिणीचा सांगाडा बाहेर काढला त्या क्षणी त्याचं मन काय म्हणत असेल? किती वेळा त्याने स्वतःलाच थांबवायचा प्रयत्न केला असेल? पण गरज आणि हतबलता माणसाला अशा वळणावर आणतात, जिथे भावना हरवतात आणि फक्त लढाई उरते

तो सांगाडा पोत्यात भरून तीन किलोमीटर चालत तो बँकेत पोहोचला

तो काही पैसे मागायला आला नव्हता

तो आपल्या बहिणीच्या अस्तित्वाचा पुरावा घेऊन आला होता

त्या बँकेत उभा असलेला तो भाऊ कागदांच्या दुनियेसमोर आपल्या नात्याची साक्ष देत होता

ओडिशा ग्रामीण बँक च्या दारात उभं राहून त्याने जणू एकच प्रश्न विचारला- माझं दुःख अजून किती वेळा सिद्ध करायचं?

ही घटना फक्त जितू मुंडाची नाही ही प्रत्येक त्या माणसाची आहे, ज्याला आपल्या हक्कासाठी स्वतःच्या जखमा उघड्या कराव्या लागतात.

नियम असावेत पण ते माणसाला तोडण्यासाठी नाहीत

व्यवस्था असावी पण ती माणुसकी गमावून नाही

आज प्रश्न पैशांचा नाही

प्रश्न आहे-आपण अजूनही माणूस आहोत का?

कारण जिथे एका भावाला आपल्या बहिणीचा सांगाडा उचलून न्यावा लागतो


तिथे व्यवस्था आधीच मृत झालेली असते आणि शेवटी उरतो तो फक्त एक प्रश्न- आपण अजून किती जितू मुंडा तयार करणार

## पंढरपुरात खून प्रकरणातील आरोपीच्या सुटकेचा जल्लोष; २० जणांवर गुन्हा

**पंढपूर । प्रतिनिधी**

खुनासारख्या गंभीर कलमाच्या गुन्ह्यातून कारागृहाबाहेर सुटल्याचा जल्लोष करण्यात आला. फटाक्याची आतषबाजी झाली. मिरवणूकही काढली गेली. यातून सार्वजनिक शांतता भंग व जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाचा भंग केल्याप्रकरणी पंढरपुरात २० जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. महत्त्वाचे म्हणजे या जल्लोषाचे व्हिडिओ देखील व्हायरल झाले आहेत. लखन उर्फ पिंटू ढावरे हा सन २०१७ साली पुणे येथे झालेल्या एका खुनाच्या गुन्ह्यात नागपूर कारागृहात शिक्षा भोगत होता. कारागृहातून सुटल्यानंतर लखन दुसऱ्याच दिवशी पंढरपुरात आला. याचवेळी त्याच्या साथीदारांनी विनापरवाना रॅली मिरवणूक काढली. डोक्यावरून फटाक्याची पेटती माळ फिरवत लोकांच्या जीवितास धोका देखील निर्माण केला. याच बाबत पोलीस हवालदार सचिन हेंबाडे यांच्या फिर्यादीनुसार २० जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

खुनासारख्या गंभीर कलमान्वये दाखल गुन्ह्यातून कारागृहाबाहेर सुटल्याचा जल्लोष साजरा करण्यासाठी फटाक्यांची आतषबाजी करीत मिरवणूक काढली. सार्वजनिक शांतता तसेच जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाचा भंग केल्याप्रकरणी २० जणांविरूद्ध शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लखन ऊर्फ पिंटू ढावरे (रा. कुंभार घाट, सहकार चौक), इसा हारूण शेख, शुभम किशोर लकेरी, कृष्णा लकेरी, यश अनिल चव्हाण, अमित अनिल पवार,



अंशुमन औदुंबर धोत्रे, सूजल संतोष थोरात, गणेश धनाजी भंडारे, साहील तांबोळी, बालाजी सीताराम पवार, दिनेश वासुदेव गोमासे, स्वयंम संतोष थोरात, शिवराज अनिल जुमाळे (सर्व रा. पंढरपूर) तसेच अन्य ५ ते ६ जणांविरूद्ध हा गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, यातील लखन ऊर्फ पिंटू ढावरे याला फरासखाना पोलीस ठाण्यात सन २०१७ मध्ये दाखल झालेल्या खुनाच्या गुन्ह्यात अटक झालेली होती.

नुकतेच २१ एप्रिल रोजी नागपूर जेलमधून बाहेर आल्यानंतर तो दुसऱ्या दिवशी (दि.२२) पंढरपुरात दाखल झाला. हा आनंद साजरा करण्यासाठी रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास त्याच्यासह साथीदारांनी शहरातील महाद्वार घाटापासून विनापरवाना रॅली व मिरवणूक काढली. परिसरात मोठ्या आवाजात आरडाओरडा करीत तसेच फटाक्यांची मोठी पेटती माळ डोक्यावरून फिरवत लोकांच्या जीवितास धोका निर्माण होईल, असे कृत्य या मिरवणुकीत करण्यात आल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले.

दोन कार आणि मोटारसायकलीही या रॅलीत सामील होत्या. अधिक तपास पोलीस करीत आहेत.

## थोडक्यात

### आरोग्य विभागाची उदासीनता; सुरक्षा रक्षकांची मनमानी

**रायगड । प्रतिनिधी**

अलिबाग जिल्हा रुग्णालयात सुरक्षा व्यवस्था कोलमडली आहे.सुरक्षा रक्षकांची मनमानी व रुग्णालयात जीवघेणे पार्किंग मुळे येणाऱ्या रुग्ण, नागरिकांमध्ये संतापाचा उद्रेक होत आहे हा मनमानी कारभार कधी थांबणार अशी जनतेमध्ये जोरदार संतप्त चर्चा होत आहे

अलिबाग जिल्हा रुग्णालयातील सुरक्षा रक्षक केबिन आणि बाह्यरुग्ण विभाग (ओपीडी) यांच्या मध्येच स्पष्ट 'नो पार्किंग'चे दोन फलक लावले असूनही, तिथेच वाहनांची बिनधास्त पार्किंग होतेय. यामुळे रुग्णवाहिका आणि आपत्कालीन वाहनांना प्रवेश अशक्य होऊन रुग्णांचे जीव धोक्यात सापडत आहेत. प्रशासनाच्या डोळ्यांखाली असा गंभीर प्रकार घडत असताना, सुरक्षा व्यवस्थेवर मोठे प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

माणगाव येथील सामाजिक कार्यकर्त्या सरोज दिनकर यांनी या दुर्दैवी चित्रावर हादरवणारी वास्तविकता उघड केली. त्या म्हणाल्या, मी परिचयाच्या रुग्णांसह अनेकदा दिवसा-रात्री रुग्णालयात धावते. 'नो पार्किंग' झोनमध्ये वाहने ठाणून बसल्याने रुग्णवाहिकांना उलट्या-सुट्या कराव्या लागतात. काही क्षणांचा विलंब रुग्णांच्या जीवावर बेतू शकतो, ही बाब अत्यंत धोकादायक आहे! त्या पुढे संतापात म्हणाल्या, काही सुरक्षा रक्षक रुग्ण आल्यावर धावून येतात, ही चांगली गोष्ट. पण बहुसंख्यजण दूर उभे राहून फक्त पाहतात किंवा दुर्लक्ष करतात. उघडच सुट्टीतही रुग्णालयात येऊन वेळकाढूपणा करतात. ही मनमानी कधी थांबेल?

दिनकर यांनी जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी आणि संबंधित प्रशासनाला धक्का देणारी मागणी केली आहे. 'नो पार्किंग' नियमांची कठोर अंमलबजावणी व्हावी, सुरक्षा रक्षकांना तात्काळ ताकीद द्यावी आणि जबाबदारी न बजावणाऱ्यांवर कारवाई करावी. अन्यथा, रुग्णांच्या जीवावरचे प्रश्न उद्भवतील! नागरिकांमध्येही रुग्णालय परिसरात शिस्तबद्ध पार्किंग आणि सुरक्षा रक्षकांची जबाबदारीची जाणीव निर्माण करण्याची मागणी जोर धरली आहे. अशा दुर्लक्षामुळे भविष्यात जीवघेणे परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.याच संदर्भात रायगड जिल्हा आरोग्य विभागातील एका वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्याला विचारले असता, नाव न छापण्याच्या अटीवर त्यांनी जबाबदारी टाळली. या गोष्टींवर आम्ही काहीच करू शकत नाही, हे आमच्या हाताबाहेर आहे! अशी निराशाजनक भूमिका घेतली.

### पंढरपूर येथे गोशाळा विस्तारासह पिकनिक स्पॉट उभारणीचा प्रस्ताव सादर करा - महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**मुंबई । प्रतिनिधी**

श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समितीच्या अखत्यारित पंढरपूर नगरपालिका हद्दीतील यमाई तलाव परिसरात गोशाळा कार्यरत आहे. या गोशाळेच्या विस्तारासह त्या ठिकाणी पिकनिक स्पॉट विकसित करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी जिल्हाधिकारी सोलापूर यांना दिले.

मंदिर समितीने गोशाळेला लागून असलेली अतिरिक्त जागा उपलब्ध करून देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे सादर केला आहे. यासंदर्भात महसूल मंत्री बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक झाली. बैठकीस मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके प्रत्यक्ष तर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज ऑनलाईन उपस्थित होते. श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समितीच्या अखत्यारीतील गोशाळेत सध्या सुमारे २२५ लहान-मोठ्या गौर जातीच्या गायी आहेत.

या गोशाळेतील गाईंच्या दुधाचा उपयोग श्री विठ्ठल-रूक्मिणीच्या नित्योपचार व महानैवेद्यासाठी केला जातो. गायींसाठी आवश्यक चारा, पशुखाद्य तसेच इतर सुविधा मंदिर समितीमार्फत उपलब्ध करून दिल्या जातात. तथापि, विद्यमान गोशाळेसाठी जागा अपुरी पडत असल्याने गोशाळा विस्ताराची आवश्यकता निर्माण झाली असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. मंदिर समितीमार्फत पंढरपूर येथील गट क्रमांक १६१ मधील ३ हेक्टर १२ आर क्षेत्राची मागणी करण्यात आली आहे. प्रस्तावित क्षेत्रापैकी सध्या गोशाळेसाठी वापरात असलेल्या मोकळ्या १.२० हेक्टर क्षेत्र आरक्षणातून वगळण्याबाबत पंढरपूर नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेची मान्यता घ्यावी.

# पुण्यात ३ अमेरिकन नागरिकांना देश सोडण्याचे आदेश

**पुणे । प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांमध्ये नाशिकमधील धर्मांतर प्रकरणावरून मोठ्या चर्चा सुरू असतानाच आता, सांस्कृतिक राजधानी असलेल्या पुण्यात देखील अशीच एक धक्कादायक घटना घडली आहे. टुरिस्ट व्हीजावर भारतात आलेले तीन अमेरिकन नागरिक ख्रिश्चन धर्माचा प्रचार करताना आढळून आल्यानंतर त्यांना १० मे च्या आत देश सोडून देण्याचे आदेश पोलिसांकडून देण्यात आले आहेत. ३ अमेरिकन नागरिक टुरीस्ट व्हीजा मिळवून काही दिवसांपूर्वी भारतात आले होते. पिंपरी चिंचवड मधील एका हॉटेलमध्ये त्यांनी २६ एप्रिलला मुक्काम केला. २७ तारखेला ते पुण्यातील शुक्रवार पेठेत आले. त्यावेळी त्यांच्याकडे मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषेत छापण्यात आलेली पत्रके होती. शुक्रवार पेठेतील एका ड्रायव्हरला त्यांनी त्यातील एक पत्रक देऊन ख्रिश्चन धर्म इतर धर्मांपेक्षा कसा चांगला आहे हे सांगण्याचा प्रयत्न केला. त्या ड्रायव्हरने तिथे बंदोबस्तासाठी असलेल्या पोलिसांना याची माहिती दिली. त्यानंतर त्या तीन अमेरिकन नागरिकांना ताब्यात घेऊन त्यांना विशेष शाखेत नेण्यात आले.

तिथे त्यांच्याकडे चौकशी केली असता ते धर्मप्रसार करण्याचा प्रयत्न करत असल्याचे समोर आले. टुरिस्ट व्हीजावर भारतात आलेल्या परदेशी नागरिकांना




धर्मप्रसार करण्यासाठी कायद्याने मनाई आहे. तरीही ते तिन अमेरिकन नागरिक धर्मप्रसार करत असल्याचे समोर आलं आहे. याआधी देखील हे तीन अमेरिकन नागरिक कधी टुरिस्ट तर कधी बीझनेस व्हीजावर भारतात आल्याचं त्यांच्या पासपोर्ट वरुन दिसून आलं आहे.

पर्यटक व्हिसावर भारतात येऊन ख्रिश्चन धर्माचा प्रसार आणि प्रचार केल्याप्रकरणी पुणे शहर पोलिसांनी तीन अमेरिकन नागरिकांना 'लीव्ह इंडिया' (भारत सोडा) नोटीस बजावली आहे. व्हिसा नियमांचे उल्लंघन केल्यामुळे या तिघांनाही १० मे २०२६ पर्यंत किंवा त्यापूर्वी भारत सोडून जाण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

एका इंग्रजी वृत्तसंस्थेने दिलेल्या वृत्तानुसार, पोलीसांच्या माहितीनुसार, ५३, ६५ आणि ६६ वर्षे वयोगटातील हे तीन अमेरिकन नागरिक १९ ते २१ एप्रिल दरम्यान पर्यटक व्हिसावर भारतात आले होते. २६ एप्रिलपासून ते पिंपरी-चिंचवडमधील एका हॉटेलमध्ये मुक्कासाला होते आणि पुणे परिसरात फिरत होते. २७ एप्रिल रोजी सकाळी, पुण्याच्या शुक्रवार पेठ भागात या तिघांनी एका खाजगी कॅब ड्रायव्हरला बायबल आणि ख्रिश्चन धर्माशी संबंधित इंग्रजी, हिंदी आणि मराठी भाषेतील पत्रके दिली. ख्रिश्चन धर्म इतर धर्मांपेक्षा श्रेष्ठ आहे, असे सांगून त्यांनी त्या चालकाचे प्रबोधन करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप पोलिसांनी केला आहे.

त्या कॅब चालकाने परिसरातून जाणाऱ्या एका रॅलीच्या बंदोबस्तावर असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांना याबाबत माहिती दिली. त्यानंतर पोलिसांनी या तिघांना ताब्यात घेऊन पोलीस ठाण्यात नेले. त्यांच्या बॅगांची झडती घेतली असता, मोठ्या प्रमाणात विविध भाषांतील धार्मिक पत्रके आढळून आली. पुणे शहर पोलिसांच्या परदेशी नोंदणी कार्यालयाने केलेल्या चौकशीत असे निष्पन्न झाले की, हे नागरिक पर्यटक व्हिसावर आले असताना धार्मिक प्रचार आणि शिकवणुकीचे काम करत होते, जे कायद्याने बेकायदेशीर आहे. परदेशी नोंदणी कार्यालयाचे पोलीस उपायुक्त संदीप भाजीभाकरे यांनी सांगितले की, इमिग्रेशन आणि फॉरेनर्स क्टमधील तरतुदींनुसार, व्हिसा नियमांचे उल्लंघन केल्याबद्दल या तिघांना 'लीव्ह इंडिया नोटीस' देण्यात आली आहे. यापूर्वी जुलै २०२५ मध्येही पिंपरी-चिंचवड पोलिसांनी एका ४१ वर्षीय अमेरिकन नागरिकाला अटक केली होती.

तो व्यक्ती आर्थिक मदतीचे आमिष दाखवून धर्मांतर करण्याचा प्रयत्न करत असल्याचे तपासात समोर आले होते. तो २०१६ पासून टुरिस्ट आणि बिझनेस व्हिसावर येत होता, मात्र कोणताही व्यवसाय न करता केवळ धार्मिक प्रचार करत असल्याचे आढळले होते.

## १ मे ते १५ ऑगस्ट: रिक्षा-टॅक्सी चालकांना मराठी शिकण्यासाठी मुदत

**मुंबई । प्रतिनिधी**



राज्य सरकारने हिंदी भाषिक रिक्षा आणि टॅक्सी चालकांना मराठी अनिवार्य करण्याचा निर्णय घेतला आहे. याला काही संघटनांनी विरोध केला होता, अनेक संघटनांनी मराठी शिकण्यासाठी वेळ मागितला होता. आज याबाबत कॅबिनेट बैठकीत चर्चा झाली. यानंतर बोलताना परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आता १ मे ते १५ ऑगस्टपर्यंत चाकलांना मराठी भाषा शिकण्यासाठी वेळ देण्यात आल्याची माहिती दिली आहे. यासाठी एक पुस्तिकाही जारी करण्यात आली आहे. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात.

कॅबिनेट बैठकीनंतर प्रताप सरनाईक यांनी म्हटले की, 'ही पुस्तिका आज आम्ही प्रकाशित केली आहे. १ मेपासून राज्यातील सर्व आरटीओंना ती देण्यात येईल. ज्या संघटना आमच्याकडे आल्या होत्या, ज्यांनी आमच्याकडे वेळ मागितली ती वेळ आता आम्ही दिलेली आहे. परंतू आता त्यांची जबाबदारी वाढलेली आहे. तुम्ही जर आमच्याकडे वेळ मागत आहात, तुम्ही हिंदी भाषिकांना मराठी शिकण्यासाठी अवधी द्या अस म्हणत आहात, तर आता तुमची जबाबदारी वाढली आहे, ही पुस्तिका आम्ही तुम्हाला देऊ. तुम्ही मला सांगितलं होतं की आम्ही आमच्या कार्यालयामध्ये मराठी शिकवू, शाखांमध्ये मराठी शिकवू, हॉल भाड्याने घेऊ आणि मराठी शिकवू अशी भूमिका त्यांनी घेतली होती. तुम्ही सुद्धा मराठी भाषेच महत्व समजून घ्या, मराठी भाषेचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी सहकार्य करत असाल तर आता ही जबाबदारी तुमची आहे.

पुढे बोलताना सरनाईक यांनी म्हटले की, '१ मे पासून १५ ऑगस्टपर्यंत ही मोहीम आम्ही राबवणार आहोत, प्रत्येक आरटीओ विभाग आपापल्या भागात जाऊन चालकाला मराठी भाषेच ज्ञान आहे की नाही ते तपासणार आहेत. तसेच तो कायद्यानुसार रिक्षा टॅक्सी चालवतो का ते पाहिले जाणार आहे. जे यात दोषी आढळतील त्यांच्यावर कायद्यानुसार कारवाई केली जाईल. मात्र मराठी भाषेबाबत १५ ऑगस्टपर्यंत आकारणार नाही. आता ही आरटीओ अधिकाऱ्यांसह चालक संघटनांची जबाबदारी वाढली आहे. आता प्रवाशांचीही जबाबदारी आहे की रिक्षामध्ये बसल्यानंतर मराठीत बोलून भाषा शिकण्यासाठी मदत करावी. मंत्री सरनाईक यांनी पुढे बोलताना म्हटले की, 'या पुस्तिकेद्वारे आम्ही जुजबी ज्ञान देत आहोत. जर कुणी मनापासून शिकण्याचा प्रयत्न केला तर हिंदी भाषिक लोक मराठी शिकू शकतो.

## छत्रपती संभाजीनगर हादरलं! रशीदपुरात अवैध गर्भपात केंद्राचा भंडाफोड

**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**



शहरातील रशीदपुरा भागात मानवतेला काळिमा फासणारी संतापजनक घटना समोर आली आहे. येथील रशीदपुरा भागात एका निवृत्त न्यायाधीशांचा बंगला भाड्याने घेऊन अवैध गर्भपात केंद्र चालवले जात असल्याचा धक्कादाय प्रकार समोर आला आहे.

पोलिसांच्या छाप्यात या अमानुष कृत्याचा पर्दाफाश झाला. धक्कादायक बाब म्हणजे, गर्भपातानंतर अर्भक थेट खिडकीतून मागील नाल्यात फेकले जात होते आणि भटक्या कुत्र्यांकडून त्यांची विल्हेवाट लावली जात होती. याप्रकरणी एका सतर्क महिलेच्या फोननंतर पोलिसांनी कारवाई करत चार जणांना अटक केली असून त्यांना ७ दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

राज्यात गेल्या काही वर्षांपूर्वी बीडमधील मुंडे दाम्पत्याकडून होत असलेल्या गर्भपात घटनेचा उलगडा झाल्यानंतर खळबळ उडाली होती. महिलांचे अवैधपणे गर्भपात करुन पैशाच्या हव्यासापोटी माणुसकीला काळिमा फासण्याचा प्रकार समोर आल्यानंतर पोलिसांनी कारवाई केली होती.

आता, छत्रपती संभाजीनगरातही असाच धक्कादायक आणि निर्दयी प्रकार उघडकीस आला आहे. १० वी उत्तीर्ण दाम्पत्याने आपल्या घरातच मिनी ऑपरेशन थिएटर उभारून गेल्या पाच वर्षांपासून अवैध गर्भपाताचा क्रूर व्यवसाय सुरू ठेवला होता. महिलांच्या जीवाशी खेळणारा हा प्रकार सोमवारी पोलिसांच्या कारवाईत उघड झाला. आरोपी वारंवार घर बदलून हा व्यवसाय हे दाम्पत्य सुरू ठेवत होते.

शहरातील रशीदपुरा परिसरात गर्भपात सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी छापा टाकला असता, एका २४ वर्षीय विवाहितेवर गर्भपाताची प्रक्रिया सुरू असल्याचे आढळले. पोलिसांनी तात्काळ हस्तक्षेप करून तिला घाटी रुग्णालयात दाखल केल्याची माहिती पोलीस निरीक्षक निर्मला परदेशी यांनी दिली.

तपासणीदरम्यान घरात सापडलेल्या साहित्याने आरोग्य पथकही हादरले. मोठ्या रुग्णालयांमध्ये वापरली जाणारी अत्याधुनिक वैद्यकीय साधने येथे उपलब्ध होती.

तब्बल २४ प्रकारची उपकरणे जप्त करण्यात आली आहेत. प्राथमिक तपासात धक्कादायक खुलासा झाला असून मुलगी असल्याच्या संशयावरून गर्भपात करण्यात आला होता.

मात्र, प्रत्यक्षात गर्भात मुलगा असल्याचे निष्पन्न झाले. तसेच गर्भपातासाठी लागणारी औषधे कुठून आणली जात होती, याचाही तपास सुरू आहे. अर्भकांची विल्हेवाट नाल्यात फेकून लावली जात असल्याचेही पोलीस तपासातून उघड झाले आहे.

## जिल्ह्यात दुसऱ्या दिवशीही कृषी केंद्रांचा कडकडीत बंद

**जालना । प्रतिनिधी**



महाराष्ट्र कृषी साहित्य विक्रेता व उत्पादक संघटना (माकसुवा) आणि जिल्हा असोसिएशनने पुकारलेल्या बेमुदत बंदला आज मंगळवारी (ता. २८) दुसऱ्या दिवशीही जिल्ह्यात १०० टक्के प्रतिसाद मिळाला. जिल्ह्यातील साडेचार हजाराहून अधिक कृषी निविष्ठा विक्रेत्यांनी आपली प्रतिष्ठाने कडकडीत बंद ठेवली असून, कृषी विभागाच्या जाचक अटी आणि खत-बियाणे कंपन्यांच्या दादागिरीविरोधात व्यापारी आता आरपारच्या लढाईच्या पवित्र्यात आहेत.

बंदच्या दुसऱ्या दिवशीही व्यापाऱ्यांमध्ये मोठा उत्साह आणि जिद्द पाहायला मिळाली. सरकार आणि कंपन्या जोपर्यंत आमच्या मागण्यांकडे गांभीर्याने लक्ष देऊन ठोस निर्णय घेत नाहीत, तोपर्यंत एकही दुकान उघडले जाणार नाही, अशी एकमुखी भूमिका व्यापाऱ्यांनी घेतली आहे. विशेषतः लिंकिंगची सक्ती, इन्स्पेक्टर राजचा जाच आणि मुदत संपलेला माल परत घेण्यास कंपन्यांकडून होणारी टाळाटाळ यांमुळे व्यापाऱ्यांमध्ये तीव्र असंतोष आहे.

या आंदोलनाला धार देण्यास पुढील रणनीती ठरवण्यासाठी प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडली. यावेळी महाराष्ट्र कृषी साहित्य विक्रेता असोसिएशनचे अध्यक्ष अतुल लड्डा यांच्यासह योगेश पटवारी, मनीष मोर, गणेश मोठे, महेश अग्रवाल, महेंद्र लाचोरीया, सुनील वाबळे, प्रशांत लड्डा, बद्रीनारायण भक्कड, आनंद अग्रवाल, आशीष राठी, नीतीन अग्रवाल, जगदीश भुतडा, सचिन गीलडा, शुभम अग्रवाल, सचीन दायमा, रमेश चव्हाण, संदीप पाटील, तन्मय पटवारी, सुनील वाबळे, शुभम झांझरीया, दीपक अग्रवाल, अजीत झंवर, श्रीकीशन साबु आदींची उपस्थिती होती. साथी पोर्टलचा कठीण वापर आणि सीलबंद निविष्ठांच्या विक्रीतही व्यापाऱ्यांवर होणारी कारवाई यांसारख्या मुद्यांवर सरकारने अद्याप कोणताही तोडगा काढलेला नाही. खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर हा बंद लांबल्यास त्याचा मोठा परिणाम बाजारपेठेवर होण्याची शक्यता आहे. मात्र, न्याय मिळाल्याशिवाय माघार नाही, असा इशारा संघटनेने दिला आहे.

## नागरी सेवा देतांना येणार्या तांत्रिक अडचणी दूर करा - अश्विन अंबेकर

**जालना । प्रतिनिधी**



नागरी सेवा हक्क दिन साजरा करण्याचा शासनाचा उद्देश हा नागरिकांना पारदर्शक, गतिमान आणि कालबद्ध पद्धतीने योग्य सेवा देणे हा आहे पण प्रत्यक्षात मात्र शासनाच्या वतीने नागरिकांसाठी ऑनलाईन पद्धतीने उपलब्ध करून देण्यात आलेल्या साईट या वेगाने काम करत नाहीत तर संथगतीने होणार्या कामामुळे योग्य त्या वेळेत नागरिकांना सेवा मिळत नाहीत त्यामुळे या सेवांमध्ये असणार्या तांत्रिक अडचणी प्रथम दूर कराव्यात अशी बाब नगरसेवक अश्विन भास्करराव अंबेकर यांनी महानगरपालिका प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिली.

जालना शहर महानगरपालिकेच्या वतीने आज मंगळवार २८ एप्रिल रोजी नागरी सेवा हक्क दिन साजरा करण्याच्या नियोजना संदर्भात महापालिकेच्या वतीने महानगरपालिकेच्या सर्व नगरसेवकांची बैठक महापौर वंदना मगरे यांच्या अध्यक्षतेखाली व उपमहापौर राजेश राऊत, सभापती अशोकराव पांगारकर, आयुक्त अंजली शर्मा यांच्या प्रमुख उपस्थितीत महापालिकेच्या अटलबिहारी वाजपेयी सभागृहात संपन्न झाली. यावेळी पुढे बोलताना नगरसेवक अश्विन अंबेकर म्हणाले की, त्यामुळे नागरी सेवा हक्क दिन साजरा करताना या सरकारी सेवांमध्ये येणार्या त्रुटी दूर केल्या तरच सामान्य नागरिकांना चांगल्या सेवा मिळतील. नागरिकांना अत्यंत संथ गतीने चालणार्या साईटमुळे जन्म-मृत्यु प्रमाणपत्र, बांधकाम परवाने, विविध करांचा भरणा केल्याच्या पावत्या यासह आदी कामांसाठी महानगरपालिकेत अनेक चकरा माराव्या लागतात. त्या थांबल्या पाहिजेत असे नगरसेवक अश्विन भास्करराव अंबेकर म्हणाले. या बैठकीस विरोधी पक्षनेते कमलेश खरे, गटनेते, दीपक राठोड, नगरसेविका दर्शना खोतकर, निखिल पगारे, दुर्गेश कठोठीवाले, अशोक पांगरकर, विजय जाधव, दिनेश भगत, अमोल ठाकूर, संजय डुकरे, योगेश भगत यांच्यासह सर्व पक्षीय नगरसेवक व अधिकार्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# सुट्टीच्या बदल्यात शरीरसुखाची मागणी, महिला कर्मचाऱ्यावर अत्याचार

**जळगाव । प्रतिनिधी**

राज्यात गेल्या काही महिन्यांपासून महिलांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये वाढ झाल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. आधी नाशिकमधील अशोक खरात प्रकरण पुढे आल्यानंतर, येथीलच एका आयटी कंपनीत महिलांवर दबाव टाकून लैंगिक अत्याचार केल्याच्या घटना समोर आल्या आहेत.

आता, जळगाव जिल्ह्याच्या बांभोरी येथील स्टोमो कंपनीतही अशाच प्रकारे वरिष्ठ अधिकाऱ्याकडून शरीर सुखाची मागणी करत कर्मचारी महिलेचा विनयभंग करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. पीडित महिलेने दिलेल्या तक्रारीवरून जनार्दन नामक कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांवर धरणगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पीडिती महिलेने तिच्या आजारी मुलीसाठी सुट्टी मागितली असता अधिकाऱ्याने महिलेकडे शरिरसुखाची मागणी करत जबरदस्ती करण्याचा प्रयत्न केला.

''तू खूप सुंदर आहे, मला तू आवडते, तू मला खुश कर, मी तुला दोन दिवस काय दहा दिवसाच्या सुट्ट्या देईन आणि पगारही कापणार नाही, असे म्हणून अधिकाऱ्याने पीडितेचा विनयभंग केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आली आहे. पीडितेने या कृत्याचा प्रतिकार केला असता, अधिकाऱ्याने तिला कानशिलात लगावून जमिनीवर पाडले आणि अश्लील चाळे केले. माझ्या ओळखीचे गुंड आणि राजकारणी आहेत, जर तू




कोणाला सांगितले तर तुला आणि तुझ्या कुटुंबाला संपवून टाकीन, अशी धमकीही संबंधित अधिकाऱ्याने दिल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आलं आहे.

अधिकाऱ्याने या घटनेचा आक्षेपार्ह व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल करण्याची भीती दाखवून पीडितेला गप्प करण्याचा प्रयत्न केला. व्हिडिओची धमकी देत अधिकाऱ्याने पीडितेला कंपनीत कामासाठी ज्या नवीन मुली येतात, त्यांना तू मला खुश करण्यासाठी मनव, तू माझे हे काम केले तर मी तुला त्रास देणार नाही, असे काम करायला सांगितल्याचे देखील तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. दरम्यान, अधिकाऱ्याच्या त्रासाला कंटाळून सात महिन्यांनंतर पीडितेने हिंमत एकवटून कुटुंबासह धरणगाव पोलीस ठाणे गाठून तक्रार दिली. त्यानुसार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. अद्याप आरोपी अधिकाऱ्याला अटक झालेली नसून तो फरार असल्याची माहिती समोर आली आहे. आरोपीचा शोध घेण्यात येत असल्याचे पोलीस अण्णासाहेब घोलप यांनी म्हटलं आहे.


# नशेसाठी वापरल्या जाणाऱ्या बटन गोळ्यांचा साठा जप्त

## शहरात नशेचा काळाबाजार उघड: ३२५ बटन गोळ्यांसह आरोपी ताब्यात

**जालना । प्रतिनिधी**

आज दिनांक २८ मंगळवार रोजी दुपारी तीन वाजता मिळालेल्या माहितीनुसार जालना शहरात नशेसाठी वापरल्या जाणाऱ्या बटन गोळ्यांची विक्री करणाऱ्या एका इसमावर कदीम जालना पोलिसांनी धडक कारवाई करत मोठा साठा जप्त केला आहे.

या कारवाईमुळे शहरात बेकायदेशीर औषध विक्री करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे. पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार, जुन्या जालना परिसरातील नूतन वसाहत भागात एक इसम बटन गोळ्यांची विक्री करत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी तत्काळ सापळा रचून संबंधित ठिकाणी छापा टाकला. छाप्यात एका संशयित इसमाला ताब्यात घेण्यात आले.





तपासादरम्यान, त्याच्याकडून Alprazolam या प्रतिबंधित घटक असलेल्या Elprasafe 0.5, Anxit 0.5, Restyl 0.5 आणि Trika 0.5 अशा विविध औषधांच्या एकूण २९ पाकिटांमधील ३२५ गोळ्या जप्त करण्यात आल्या. या गोळ्या बटन गोळ्यांच्या स्वरूपात नशेसाठी वापरल्या जात असल्याचे निष्पन्न झाले.

अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी या औषधांबाबत माहिती देताना सांगितले की, -श्रीरिूश्ररा हा घटक वैद्यकीय सल्ल्याशिवाय वापरणे धोकादायक असून, त्याचा गैरवापर मानवी आरोग्यास गंभीर धोका निर्माण करू शकतो.

पोलिसांनी संबंधित आरोपीविरुद्ध छञ्झड कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला असून, या प्रकरणातील फरार असलेल्या अन्य संशयितांचा शोध सुरू आहे.

सदरची पोलीस अधीक्षक कारवाई अजय कुमार बसंल, अप्पर पोलीस अधीक्षक आयुष नोपानी, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी, यांच्या मार्गदर्शनाखाली कदीम जालना पोलीस निरीक्षक जे.बी. शेवाळे, सहा आयुक्त जिवन जाधव अन्न व औषधी प्रशासन जालना, पोहेकॉ सचिन चौधरी, पोहेकॉ सदा राठोड, पोना/बाबा गायकवाड, पोकॉ/मतीन शेख, पोकॉ संदीप चव्हाण, पोकों/दिलीप गायकवाड, पोकों/इम्रान खॉन यांनी केली आहे.

# दु:खीनगर येथील चाकू हल्यातील चार जणांवर कदीम जालना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**जालना । प्रतिनिधी**

शहरातील दुखी नगर परिसरात जुन्या वादातून एका तरुणावर जीवघेणा चाकू हल्ला झाल्याची धक्कादायक घटना २२ एप्रील रोजी रात्रीच्या सुमारास घडली होती.

या प्रकरणी कदीम जालना पोलीस ठाण्यात चार आरोपींविरुद्ध गंभीर गुन्हा दाखल करण्यात आला असून परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी अरशद असलम कुरेशी (वय २२) हा आपल्या नातेवाईकासोबत २२ एप्रिल रोजी रात्री सुमारे ११:१५ वाजता मोटारसायकलवरून जात असताना दुखी नगर येथे आरोपींनी त्याला अडवले. यावेळी जुन्या भांडणाचा राग मनात धरून आरोपींनी त्याच्यावर लाकडी दांडके व चाकूने हल्ला चढवला.



या हल्ल्यात अरशद गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. हल्लेखोरांनी त्याच्या पोटावर वार करण्याचा प्रयत्न केल्याची माहितीही समोर आली आहे, मात्र सुदैवाने तो थोडक्यात बचावला. या प्रकरणी अब्दुल सैफ आ.हाफीज रा.रहेमानगंज, अब्दुल जबी अ.सगीर रा.नशनल नगर, अबूजर रा. नशनल नगर आणि नबील सलीम सिद्दीकी यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा तपास सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक अमित मस्के करत आहेत. सध्या या हल्ल्याचा व्हिडिओ सोशल मिडियावर वायरल होत आहे.

दरम्यान, शहरात वाढत्या गुन्हेगारी घटनांमुळे नागरिकांमध्ये चिंता व्यक्त केली जात असून, पोलिसांनी कडक कारवाई करून अशा गुन्हेगारांवर लगाम लावावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# जालन्यात पोलीस कॉम्प्लेक्सजवळ झेरॉक्स दुकानाला भीषण आग! सागर झेरॉक्स दुकान पूर्णत: जळून खाक

**जालना । प्रतिनिधी**

आज दिनांक २६ रविवार रोजी सकाळी नऊ वाजता मिळालेल्या माहितीनुसार

जालना शहरातील पोलीस कॉम्प्लेक्स परिसरात असलेल्या ‘सागर झेरॉक्स व कोल्ड्रिंक सेंटर’ या दुकानाला भीषण आग लागल्याची घटना काल संध्याकाळी घडली. या आगीत दुकानातील संगणक, लॅपटॉप, झेरॉक्स मशीन, कोल्ड्रिंकच्या बाटल्या, पाण्याच्या बाटल तसेच फर्निचर पूर्णतः जळून खाक झाले असून दुकान मालकाचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे.

ही दुकान एडवोकेट नीरज बागडी यांची असून आगीमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली.



आगीची तीव्रता इतकी भयानक होती की, शेजारील विद्युत पुरवठा करणाऱ्या डीपीलाही आग लागली. त्यामुळे आग अधिक भडकण्याची आणि मोठे नुकसान होण्याची भीती निर्माण झाली होती.

आगीची तीव्रता लक्षात घेत स्थानिक नागरिकांनी तात्काळ अग्निशमन दलाला पाचारण केले. अग्निशमन दलाच्या जवानांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत शर्थीचे प्रयत्न करत आगीवर नियंत्रण मिळवले. त्यांच्या वेळेवर केलेल्या कारवाईमुळे मोठा अनर्थ टळला. आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पुढील तपास सुरू आहे.

# जालना मर्चंट बँकेच्या २३ कोटींच्या घोटाळ्याचा फटका

**जालना । प्रतिनिधी**

जालना कृषी उत्पन्न बाजार समितीतील व्यापाऱ्यांचे कोट्यवधी रुपये मोतीराम अग्रवाल जालना मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँकेत अडकले असल्याने मोठा आर्थिक पेच निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर बाजार समितीतील व्यापाऱ्यांनी आजपासून बेमुदत बंद पुकारला आहे. परिणामी, शेतीमाल विक्रीसाठी येणाऱ्या शेतकऱ्यांना मोठा फटका बसत असून हमाल वर्गही हतबल झाला आहे. बाजार समितीत शेतकऱ्यांकडून विक्री झालेल्या शेतीमालाचे पैसे २४ तासांत देणे बंधनकारक आहे. मात्र व्यापाऱ्यांचे पैसेच जालना मर्चंट बँकेत अडकून पडल्याने त्यांच्याकडे व्यवहार करण्यासाठी निधी उपलब्ध नाही. त्यामुळे व्यापाऱ्यांनी तातडीने व्यवहार बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

दरम्यान, २३ कोटींच्या घोटाळ्यामुळे संबंधित बँक सध्या चर्चेत असून आर्थिक गुन्हे शाखेमार्फत चौकशी सुरू आहे. या प्रकरणामुळे व्यापारी अडचणीत आले





आहेत, तर दुसरीकडे शेतकऱ्यांचे पैसे अडकण्याची भीती निर्माण झाली आहे. या बंदमुळे बाजार समितीतील व्यवहार पूर्णपणे ठप्प झाले आहेत. शेतकरी, हमाल आणि इतर कामगार यांचे रोजंदारीवर परिणाम होत असून सर्वच घटक आर्थिक संकटात सापडले आहेत. असंघटित कामगार संघटनेने व्यापाऱ्यांनी लवकरात लवकर व्यवहार सुरू करावेत, अन्यथा त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्याची मागणी केली आहे. तर बाजार समिती प्रशासनाने परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे सांगितले आहे. एकीकडे बँक घोटाळ्याची चौकशी सुरू असताना, दुसरीकडे शेतकरी आणि व्यापाऱ्यांवर त्याचे गंभीर परिणाम दिसत आहेत. आता प्रशासन या परिस्थितीतून मार्ग कसा काढते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# खूनांची मालिका थांबेना; गोंदेगावात तरुणाचा निर्घृण खून

**जालना । प्रतिनिधी**

जिल्ह्यात खूनांची मालिका थांबण्याचं नाव घेत नसतानाच आणखी एक धक्कादायक घटना समोर आली आहे. तालुक्यातील गोंदेगाव येथे एका तरुणाचा दगडाने ठेचून निर्घृण खून करण्यात आल्याने संपूर्ण परिसरात भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. सतत घडणाऱ्या अशा घटनांमुळे पोलीस यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

आज पहाटे गोंदेगाव येथील ३३ के. व्ही. विद्युत उपकेंद्राच्या पाठीमागील मोकळ्या जागेत एका तरुणाचा रक्ताने माखलेला मृतदेह आढळून आला. डोक्यावर दगडाने वार करून त्याची निर्दयी हत्या करण्यात आल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट झाले. ही माहिती गावात वाऱ्यासारखी पसरताच मोठी गर्दी घटनास्थळी जमली. मृत तरुणाची ओळख अंबड तालुक्यातील मच्छीन्द्र कोंडीबा दराडे पाणेगाव येथील



रहिवासी असून गोंदे गावचा पाहुना आहे.

अशी ओळख झाली आहे. तो आपल्या मामीच्या अंत्यसंस्कारासाठी गोंदेगाव येथे आला होता. अंत्यसंस्कारानंतर तो नातेवाईकांकडे थांबला होता. मात्र रात्री अचानक बेपत्ता झाल्यानंतर आज सकाळी त्याचा मृतदेह सापडल्याने नातेवाईकांवर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. घटनेची माहिती मिळताच तालुका पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलीस निरीक्षक संतोष साबळे यांच्यासह पथकाने पंचनामा करून मृतदे तपासणीसाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठवण्यात आला असून पोलिसांच्या वतीने, आरोपींचा शोध घेण्यासाठी तपासाची चक्रे वेगाने फिरवली जात असल्याचा दावा करण्यात येत आहे.

मात्र, जालन्यात वारंवार घडणाऱ्या खूनांच्या तसेच मारहाण चाकू हल्ला या घटनांमुळे नागरिकांमध्ये प्रचंड असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. पोलीस केवळ घटनेनंतरच सक्रिय होतात का?, असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. गुन्हेगारांना आळा घालण्यात अपयश येत असल्याने पोलीस प्रशिक्षण, गस्त आणि गुप्त माहिती यंत्रणेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

दरम्यान, या घटनेमुळे जालना जिल्ह्यात कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, आरोपींना लवकरात लवकर अटक करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# बनावट कागदपत्रांद्वारे जालन्यातील सर्व्हे ५५४ मधील ५ एकर जमीन हडपण्याचा प्रयत्न उघडकीस

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील मंठा रोडवरील डी-मार्टच्या बाजूला असलेल्या सर्व्हे क्र. ५५४ मधील ११ एकरपैकी ५ एकर (कल्याणी ग्रीन्स) शेतजमीन बनावट कागदपत्रांच्या आधारे हडपण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी जालना न्यायालयाने गंभीर दखल घेतली आहे. या प्रकरणात मयताचा १ महिला वारसदार संध्या राजेंद्र डागा, तिचा पती राजेंद्र सोभागमल डागा (दोघे रा. हिंगणघाट, जि. वर्धा), पॉवर ऑफ टर्नी अधिकार दिलेले आशिष अशोक छाजेड (रा. जालना) यांनी खोट्या कागदपत्राद्वारे रजिस्ट्री केली. जालन्याचे तत्कालीन भूमी अभिलेख उपअधीक्षक रवींद्र मुथा आणि जालनाचे सेवानिवृत्त दुय्यम निबंधक बद्रीनाथ बी. वाडेकर दोन बड्या अधिकाऱ्यांच्या संगनमताने हा फसवणुकीचा कट रचल्याचा ठपका ठेवत, न्यायालयाने या ५ जणांविरुद्ध फौजदारी गुन्हा नोंदवण्याचे आदेश दिले आहेत. या आदेशानुसार कदीम जालना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फसवणुकीच्या प्रकरणात दोन अधिकार्यांचा सहभाग आढळल्याने जिल्हा प्रशासनात प्रचंड खळबळ उडाली आहे.

या प्रकरणाची अधिक माहिती अशी की, अंकित अभयकुमार आबड (वय ३३, रा. नळगल्ली, जालना) हे कृषी आणि बांधकाम व्यावसायिक आहेत. त्यांचे आजोबा दिवंगत कचरुलाल आबड हे हिंदू अविभक्त कुटुंबाचे कर्ता होते. जालना येथील सर्व्हे क्र. ५५४ मधील ५ एकर जमिनीवरून आबड कुटुंब आणि आणि त्यांची बहीण संध्या डागा यांच्यात १९८६ पासून दिवाणी न्यायालयात वाद सुरू आहे. दिवाणी अपील क्र. १११/२०२० हे तांत्रिक कारणास्तव एप्रिल २०२२ मध्ये फेटाळले गेल्यानंतर, आरोपींनी या संधीचा गैरफायदा घेतला. संध्या डागा यांनी या जमिनीवर ताबा नसतानाही २० ऑगस्ट २०२१ रोजी आशिष छाजेड यांच्या नावाने एक बनावट जनरल पॉवर ऑफ अटर्नी (मुखत्यारपत्र) तयार केले. या कटात तत्कालीन भूमी अभिलेख उपअधीक्षक रवींद्र मुथा आणि दुय्यम निबंधक बद्रीनाथ बी. वाडेकर यांनी आपल्या पदाचा गैरवापर केल्याचा आरोप आहे. मुथा यांनी बनावट कागदपत्रांच्या आधारे ६ मे २०२२ रोजी कोणतीही नोटीस न देता आबड कुटुंबाचे नाव काढून संध्या डागा यांचे नाव प्रॉपर्टी कार्डवर चढवले. नाव नोंदणी होताच, त्याच दिवशी दुय्यम निबंधक वाडेकर यांनी कायदेशीर प्रक्रियेकडे दुर्लक्ष करून या जमिनीचे चार वेगवेगळे विक्री करारनामे (नोंदणी क्रमांक २३१० ते २३१३) करून दिले. अंकित आबड यांनी या प्रकरणी नोव्हेंबर २०२२ मध्ये पोलिसांकडे धाव घेतली होती.





मात्र, पोलिसांनी गुन्हा दाखल न केल्याने त्यांनी न्यायालयात धाव घेतली. न्यायालयाने पोलीस अहवाल आणि कागदपत्रांची पडताळणी केली असता प्रॉपर्टी कार्डशी संबंधित मूळ सरकारी फाईलच रेकॉर्ड रूममधून गायब आहे, ज्यामुळे नोंदींमध्ये फेरफार झाल्याचा संशय बळावला व विक्री करारनाम्यासोबत जोडलेले ले-आउट नकाशे आणि नगररचना विभागाकडील अधिकृत नकाशे यात मोठी तफावत आढळली. वाडेकर यांनी रद्द झालेले पीआर कार्ड जोडलेले आढळून आले. न्यायाधीश आर. एम. देवर्षी यांनी नमूद केले की, हा केवळ दिवाणी वाद नसून बनावट कागदपत्रे तयार करून सरकारी नोंदींमध्ये फेरफार करण्याचा फौजदारी गुन्हा आहे. यामध्ये सार्वजनिक सेवकांचा सहभाग असल्याने सखोल पोलीस तपासाची गरज व्यक्त करत न्यायालयाने कलम १५६(३) नुसार कारवाईचे आदेश दिले. दरम्यान, संबंधित पोलीस अधिकाऱ्याचे म्हणणे मागवण्यात आले होते. त्यानुसार या प्रकरणाची सूक्ष्म चौकशी कदीम जालना ठाण्याच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक आरती जाधव यांनी करून सविस्तर अहवाल दिला. त्यावरूनच हे फसवणूक प्रकरण समोर आले. या प्रकरणात फिर्यादीच्या बाजूने ड. दर्शित आबड यांनी काम पाहिले. त्यांना मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठातील ड. आशिष जाधवर, जालना येथील ड. पी. डब्ल्यू. कुलकर्णी यांचे मार्गदर्शन लाभले. न्यायालयाच्या आदेशानुसार दि. २४ एप्रिल २०२६ रोजी कदीम जालना पोलिसांनी संध्या राजेंद्र डागा, राजेंद्र सोभागमल डागा, आशिष अशोक छाजेड यांच्यासह जालन्याचे तत्कालीन भूमी अभिलेख उपअधीक्षक रवींद्र मुथा आणि जालनाचे सेवानिवृत्त दुय्यम निबंधक

बद्रीनाथ बी. वाडेकर या ५ जणांविरुद्ध भारतीय दंड संहितेच्या कलम ४२०, ४६७, ४६८, १२०-बी आणि ३४ अन्वये गुन्हा नोंदवला असून, या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक जनार्दन शेवाळे हे करत आहेत. महसूल आणि नोंदणी विभागातील अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल झाल्याने जिल्हा प्रशासनात मोठी खळबळ उडाली आहे.

## संक्षिप्त

### भटक्या कुत्र्यांचा रेबीज धोका; जे.एस. डब्ल्यू.साळाव कचऱ्यामुळे निडी गाव त्रस्त!

**रायगड । प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील मुरुड तालुक्यातील निडी गावाजवळील जे. एस . डब्लू.स्टील कंपनीच्या वसाहतीतून निघणाऱ्या कचऱ्यामुळे ग्रामस्थांना आरोग्यसंकटाचा सामना करावा लागत आहे. ग्रामस्थ प्रकाश चंद्रकांत तांबडे यांनी ग्रुप ग्रामपंचायत साळाव यांच्याकडे लेखी तक्रार नोंदवली असून, कंपनीने निडी रस्त्याच्या बाजूला उघड्यावर कचरा टाकल्याने दुर्गंध, प्रदूषण आणि श्वसनाचे आजार होत असल्याचे सांगितले आहे.

कंपनी वसाहतीतील कचरा रस्त्यावर उघडे पडल्याने ग्रामस्थ, शाळकरी मुले आणि ज्येष्ठ नागरिकांना दुर्गंध आणि धुराचा त्रास होतो, ज्यामुळे आरोग्याला धोका निर्माण होतो.

कचरा जाळल्याने श्वसनाचे आजार वाढतात; भटकी कुत्रे, बकऱ्या, गाई-गुरे हा कचरा खाऊन विषबाधा होऊ शकते, रेबीजचं प्रमाण वाढल्याने चावण्याचा धोका. ग्रुप ग्रामपंचायत साळावचे सरपंच वैभव कांबली आणि ग्रामविकास अधिकारी बिरवाडकर यांनी जे.एस. डब्ल्यू स्टील लि., साळाव येथील व्यवस्थापक (सी एस आर विभाग) यांना लेखी पत्र दिले आहे. पत्रात कचऱ्याचं त्वरित व्यवस्थापन, डंपिंग ग्राउंडमध्ये विल्हेवाट आणि कंपाउंड उभारण्याची मागणी केली असून, कार्यवाही न झाल्यास पुढील कायदेशीर कारवाईची चेतावणी देण्यात आली आहे.

कंपनीने सी एस आर अंतर्गत वेस्ट मॅनेजमेंट उपक्रम राबवले असले तरी स्थानिक तक्रारींना प्रतिसाद देताना कारवाईची गरज आहे.

### ‘एनटीपीसी’ सोबत रायगड जिल्ह्यातील अंबा-कुंभे जलविद्युत प्रकल्प क्षमतावाढीसाठी करार

**मुंबई । प्रतिनिधी**

एनटीपीसी लिमिटेडच्या रायगड जिल्ह्यातील कुंभे व अंबा उदंचन जलविद्युत प्रकल्पांच्या स्थापित क्षमतावाढीसंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत जलसंपदा विभाग आणि ‘एनटीपीसी‘ यांच्यात सुधारित सामंजस्य करार करण्यात आला. या दोन्ही प्रकल्पांच्या क्षमतेमध्ये १८०० मे.वॅ. वरून २६०० मे.वॅ. वाढ होणार आहे. मंत्रालयातील समिती सभागृहात झालेल्या या कार्यक्रमास महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जलसंपदा (विदर्भ, तापी आणि कोकण विकास पाटबंधारे विकास महामंडळ) व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, जलसंपदा सचिव संजय बेलसरे, मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्रा, मुख्यमंत्री कार्यालयाचे प्रधान सचिव डॉ श्रीकर परदेशी, ‘एनटीपीसी’चे विभागीय कार्यकारी संचालक (वेस्टन रिजन) ई सत्या फानी कुमार, महाप्रबंधक (हायड्रो) मनमीत बेदी, एनटीपीसीचे (हायड्रो इंजिनिअरिंग) सहायक महाप्रबंधक डॉ. अनुभव, हायड्रो इंजिनिअरिंगचे उप महाप्रबंधक डॉ. प्रशांत पांडे, डॉ. अरबिंद कुमार, अपर महाप्रबंधक सूर्य प्रकाश केसरवानी, अंबा पीएसपीचे सागर धांडे आदि उपस्थित होते.

जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव श्री. कपूर व एनटीपीसीचे विभागीय कार्यकारी संचालक श्री. ई. सत्या फानी कुमार यांनी सामंजस्य करार करण्यात आला. यावेळी श्री. कपूर यांनी कराराची माहिती दिली. सार्वजनिक खाजगी भागीदारीव्दारे उदंचन जलविद्युत प्रकल्प विकसन करण्याचे धोरण दि.२० डिसेंबर २०२३ रोजी निर्गमित करण्यात आले आहे.

आतापर्यंत ५९ सामंजस्य करार झाले आहेत. एनटीपीसी बरोबरचा हा राज्याचा एकूण ६० वा सामंजस्य करार आहे. या धोरणास अनुसरून ६० सामंजस्य करारांद्वारे ८२,०१५ मे.वॅ. वीज निर्मिती क्षमता अपेक्षित असून याव्दारे रु. ४.२८ लक्ष कोटी इतकी गुंतवणूक तर १.३१ लक्ष मनुष्यबळ रोजगार निर्मिती होणार आहे. एनटीपीसीचा उदंचन जलविद्युत प्रकल्पासाठीचा सुधारित सामंजस्य करार एनटीपीसी लिमिटेड यांनी रायगड जिल्ह्यातील अंबा व कुंभे या उदंचन जलविद्युत प्रकल्पांचे सविस्तर सर्वेक्षण केल्यानंतर प्रकल्पांच्या स्थापित क्षमतेमध्ये ८०० मे.वॅ. ने वाढ होत असल्याचे निदर्शनास आले.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक ज्योती मधुकर आडेकर यांनी डी.बी. कॉर्प लि. दिव्य मराठी, डी. १८१, शेंद्रा एम.आय.डी.सी. छत्रपती संभाजीनगर(औरंगाबाद) - ४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून, कार्यालय दैनिक महिला संवाद, सी-२०३, अनंत पार्क, काळेवाडी रोड, राहटनी, धनगर बाबा मंदीराजवळ, पुणे शहर, पुणे - ४११०१७(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. संपादक : ज्योती मधुकर आडेकर, मो. नं. ९१६८५६७१११, कार्यकारी संपादक : विद्या जाधव, उप संपादक : सौ. सुनंदा राजु निक्रड, मेल आयडी - mahilasanvad11@gmail.com, पीआरजीआय नोंदणी क्रमांक - **MHMAR/25/A1224**

Printer, Publisher & Owner Jyoti Madhukar Adekar, Printed At D. B. Corp Ltd., Divya Marathi, D 181, SHENDRA MIIDC Chatrapati Sambhaji Nagar (AURANGABAD) - 431003(Maharashtra), And Published At Office Daily Mahila Sanvad C-203, Anant Park, Kalevadi Road, Rahatni, Near Dhangar Baba Mandir, Pune City, Pune -411017 (Maharashtra), Editor : Jyoti Madhukar Adekar, Mob. No. 9168567111, Executive Editor : Vidya Jadhav, Deputy Editor : Sau. Sunanda Raju Nikrad, E-Mail : mahilasanvad11@gmail.com **PRGI Reg. No. - MHMAR/25/A1224**